I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 412-415
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article

Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# नैसर्गिक संसाधने व शाश्वत मानव विकास

वनिता. य. वंजारी
श्री.शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,राजुरा
*Corresponding Author: vrbarai11@gmail.com

Communicated : 02.01.2023 | Revision : 08.01.2023 Accepted : 15.01.2023 | Published: 27.01.2023

**सारांश :-**

विकासाची गरज वर्तमान व भविष्यकालीन मानवी जीवन उंचावण्यासाठी आहे. मानवी विकास आणि पर्यावरण यांचा अतुट संबंध आहे. पर्यावरणाचे नैसग्रीक संतुलन राखण्याकरिता मानवाच्या क्रियाकर्मात अशा पध्दतीने बदल करणे गरजेचे आहे की ज्याव्दारे पर्यावरणाच्या घटकांचा कमीत कमी –हास होऊन मानवी विकास साधला जाईल. अशा विकासाला श्वाश्वत विकास म्हणतात.
निसर्गसंपत्तीचा वापर करून मानवी विकास केला तरच पृथ्वीवरील सर्व सजीवाचे अस्तित्व कायम राहील. जंगलतोड करतांना त्याचप्रमाणात जंगल लागवड करणे, वाहणामध्ये खणिज तेलाचा वापर न करता नैसर्गिक वायू किंवा जैव इंधनाचा वापर करणे. आर्थिक विकास करतांना पर्यावरणाच्या रक्षणाची नैतिक जबाबदारी प्रत्येक व्यक्तिची आहे. आपल्या वर्तमान व भावी पिढींना आपल्या पर्यावरणातील नैसर्गीक साधनसंपत्तीचा उपयोग घेता येईल याचा विचार आज प्रत्येकाने केला पाहिजे म्हणूनच श्वाश्वत विकासाची आज फारच गरज आहे.

**बीजसंज्ञा :-** विकास, श्वाश्वत, पर्यावरण, साधनसंपत्ती, अतुट.

## प्रस्तावना :-

सामान्यपणे सभोवतालच्या परिस्थितीला पर्यावरण म्हणतात. पृथ्वीच्या पृष्ठभागावर वातावरण आणि पृथ्वीच्या अंतरंगात जे काही सामावलेले आहे त्या सगळयांचा समावेश पर्यावरणात होतो. यामध्ये जमीन, हवा, पाणी,सर्व वनस्पती, सर्व सजीव, खनीजे, नैसर्गीक वायू, खनीज तेल इत्यादीचा समावेश होतो. त्या सर्वांची मिळून तयार होणारी परिस्थिती म्हणजे पर्यावरण होय.

## पर्यावरणाची व्याख्या:-

विश्वकोशानुसार ''पर्यावरणामध्ये त्या सर्व परिस्थीतीचा ,संघटनेचा आणि परिणामाचा समावेश करता येतो, ज्या एखादया जीवाचा किंवा जातीचा जन्म, विकास आणि मृत्युदर परिणाम करणा–या असतात''

डी. एच. डेनीस यांच्या मतानुसार:- पर्यावरणचा संबंध भूमी आणि मानव जे चहूबाजूंनी ज्या नैसग्रीक परिस्थितीने वेढलेले आहेत ,ज्यामध्ये ते निवासी आहेत त्यांचीच नाहीतर त्यांचा परिणाम त्यांच्या स्वभावावर आणि कार्यशिलतेवरही झालेला स्पष्ट दिसतो. यामध्ये नैसर्गीक, जैवीक, रासायनीक, आर्थिक, सामाजीक अशा सर्व घटकांचा समावेश होतो.

## पर्यावरणाचे महत्व:-

पृथ्वीवरील सर्व सजीवासाठी पर्यावरणाचे महत्व अवर्णनीय आहे. विशेषत: मानवी जीवन दीर्घआयुषी ,सुखकर, आनंदमय आणि

सुरळीत होण्यासाठी पर्यावरणीय संतुलनाची तसेच पर्यावरणीय अभ्यासाचे महत्व आहे.

१.आर्थिक विकासासाठी उद्योगधंदयातील गतीमानता वाढलेली आहे. या कार्यामध्ये मानवाने वृक्षतोड करून सिमेंटची जंगले उभारलेली आहे. एक प्रकारे नैसर्गीक प्रक्रियेत मानवी हस्तक्षेप वाढलेला आहे.व त्यातून प्रदूषन वाढून मपनवी जीवन धोक्यात आलेले आहे.हे सर्व टाळण्यासाठी पर्यावरणाचा अभ्यास ,पर्यावरणाबद्यल लोक जागृती,प्रदूषण नियंत्राक आवश्यक बनलेले आहे.

२. पर्यावरण विज्ञानामध्ये सर्व प्रकारच्या साधनसंपत्तीचा अभ्यास समाविष्ट आहे. मानवी जीवन विकासासाठी नैसर्गीक साधनसंपत्तीची अत्यंत आवश्यकता आहे. त्या सर्व साधनसंपदेचे परिपूर्ण ज्ञान पर्यावरण अभ्यासातूनच प्राप्त होते.

३. पर्यावरणामध्ये मनुष्य व त्याच्या सभोवतालच्या परिस्थिच्या परस्पर संबंधाचा निसर्ग आणि सजीव घटकातील अंतर क्रियांचा अभ्यास केला जातो म्हणजे या सर्व परिस्थितीला परस्पर संबंध आणि आंतर क्रिया यांचे आकलन पर्यावरण शिक्षणातून होते.

४. मानवी विकासासाठी आवश्यक ठरलेल्या उद्योगधंदयासाठी वाहतूकीसाठी उर्जासरधनांची आवश्यकता आहे. बहुतांशी सर्व उर्जा साधणे पारंपारीक स्वरूपाची आहेत, पारंपारीक उर्जा साधणे संपुष्टात येवू लागल्याने अपारंपारीक उर्जा साधनांचा उपयोग करणे आवश्यक आहे. अपारंपारीक उर्जा साधनां बद्यलचे ज्ञान पर्यावरण अभ्यासातूनच होते.

५.भूतलावर, जलभागावर किंवा अवकाशात निरनिराळे प्रदूषन वाढत आहे त्या प्रदूषना विषयीचे सखोल ज्ञान पर्यावरणाच्या अभ्यासातूनच प्राप्त होते.

६.वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक समस्या निर्मान होत आहे. तसेच सामाजीक प्रदूषणही वाढत आहे. लोकसंख्येच्या समस्यांचे निराकरण, लोकसंख्या वाढीवरील नियंत्रण या सर्वांचा अभ्यास पर्यावरणात सामावलेला आहे.

७. पर्यावरणाध्ये 'जगा व जगू दया' हा महत्वाचा सिध्दांत पाळला जातो. या सिध्दांताची व संदेशाची माहिती सर्वांना होण्यासाठी पर्यावरण अभ्यासणे महत्वाचे आहे.

मानवी विकासामध्ये एकतर्फी विचार न करता बहुआयामी धोरण स्विकारून परस्परांची गुणवत्ता सांभाळणे महत्वाचे असते. वर्तमान व भविष्यकालीन मानवी जीवन उंचावण्यासाठी श्वाश्वत विकासाची गरज आहे. मानवी विकास व पर्यावरण यांचा अतूट संबंध आहे पर्यावरणाचे नैसर्गीक संतुलन राखण्याकरिता मानवाच्या क्रिया-कर्मात अशा पध्दतीने बदल करणे गरजेचे आहे की ज्या व्दारे पर्यावरणाच्या घटकांचा कमीत कमी -हास होऊन मानवी

विकास साधला जाईल अशा विकासाला शाश्वत विकास असे म्हणतात.

**जागतीक पर्यावरण व विकास आयोग यांच्या मते:-**

"भावी पिढीच्या गरजा पूर्ण करण्याची पर्यावरणाची क्षमता कायम ठेवून पर्यावरणाचा –हास न करता वर्तमान पिढीच्या सर्व गरजा पूर्ण करणरा विकास म्हणजे श्वाश्वत विकास होय.''

निसर्गसंपत्तीचा योग्य वापर करून मानवी विकास केला तरच पृथ्वी वरील सर्व सजीवांचे अस्तित्व कायम राहील.जंगलतोड करतांना त्याच प्रमाणात जंगल लागवड करणे.वाहन यंत्रामध्ये खनिज तेलाचा वापर न करता नैसर्गीक वायू किंवा जैव इंधनाचा वापर करून हवेचे प्रदूषन कमी करून खनिज तेलाचे संवर्धन केले जाईल. शेतीकरिता जमीनीचा उपयोग करतांना रासायनिक खतांचा वापर न करता सेंद्रिय व नैसग्रीक खतांचा उपयोग करून जमीनीची पोषण क्षमत कायम राखली जाईल.

खनिज तेल, नैसर्गीक वायू, कोळसा इ. क्षय उर्जा साधने अतिवापरामुळे नष्ट होण्याच्या मागप्रवर असल्यामुळे त्यांचा वापर मर्यादीत करून त्या ऐवजी पवन, सौर, जल व नैसर्गीक उर्जा साधनांचे संवर्धन देखील होईल.

वर्तमान व भविष्यकालीन मानवी जीवन उंचावण्यासाठी श्वाश्वत विकासाची अतिशय गरज आहे. कारण मानवाचा विकास व त्याच्या पर्यावरणातील नैसर्गीक संपत्ती यांचे अतुट नाते आहे. पर्यावरणाचा –हास म्हणजेच सजीवांच्या –हासाची नांदी होय.आपला आसमंत निकोप राहून वर्तमान व भविष्यकालीन जीवन सुखकर होणार आहे. आर्थिक विकास करतांना पर्यावरणाच्या रक्षणाची नैतीक जबाबदारी प्रत्येक व्यक्तिची आहे. आपल्या वर्तमान व भावी पिढींना आपल्या पर्यावरणातील नैसर्गीक साधनसंपत्तीचा उपयोग घेता येईल.याचा विचार आज प्रत्येकाने केला पाहीजे. म्हणूनच श्वाश्वत विकासाची आज फारच गरज आहे. श्वाश्वत विकास करण्यासाठी सर्वच क्षेत्रात अनेक समस्या निम्रन झालेल्या आहेत. उदा. उर्जा, पाणि, जमीन, कृषी, हवा, लोकसंख्या, औद्योगीकरण, तंत्रज्ञान इ.

उर्जा:- उर्जा साधनाशिवाय आर्थिक विकास नगण्य आहे. औद्योगीकरणाकरिता तंत्रज्ञानाचा उपयोग करून मानव मोठया प्रमाणावर उर्जा साधनांचा उदा.कोळसा, खनिजतेल, नैसर्गीक वायू इत्यादीचा वापर करून त्यांचा –हास करित आहे. या प्रकारची नैसर्गीक उर्जा साधने भविष्य काळात निर्मान करणे अशक्य आहे. या उर्जा साधनांचे साठे भूगर्भात मर्यादीत स्वरूपात असल्यामुळे भविष्यात ते संपतील भारतात खनिजतेलाच्या उत्पादनाव्दारे ६०% गरज पूर्ण होते त्यामुळे ४०% आयात करावे लागते.

सर्वेक्षणानुसार भारतात २४० ते ७५० अब्ज टन कोळश्याचा साठा आहे व दरवर्षी ४०० दक्षलक्ष टन कोळसा वापरला जातो. याच प्रमाणात कोळसा वापरल्यास फक्त १५० वर्षापर्यंत हा साठा पुरेल पुढे काय? खनिज तेल, कोळसा या सारख्या पारंपारीक उर्जा साधना ऐवजी सौर उर्जा? पवन जलीय व जैवीक उर्जा साधनांचा उपयोग करून आपण शाश्वत विकास करू शकतो.

उर्जेच्या पूर्ततिसाठी नैसर्गीक साधनसंपत्तीचे शोषण करणे धोक्याचे ठरते. भविष्य कालीन संपूष्टात येणा-या उर्जा साधनांचा विचार करता सौर उर्जा, पवन उर्जा अधिकाधिक उपयोगात आणली पाहिजे तसेच सागरी उर्जा, भूऔष्णिक उर्जा, हायड्रोजन उर्जा, जैव उर्जा यांच्या उपयोगीतेकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

सध्या जगात २५% लोकसंख्या दारिद्रयाचे व धकाधकीचे जीवनजगत आहे. ५% लोक फक्त सधन, समृध्द व सुखी जीवन जगत आहे. म्हणून विकासात कोणतीही तडजोड नकरता वर्तमान व भविष्यकालीन पिढयांच्या सुखी व समृध्द जीवनाकरिता शाश्वत विकासचा अवलंब करणे मानवाच्या हिताचे आहे.

**निष्कर्ष:-**

निसर्गसंपत्तीचा योग्य वापर करून मानवी विकास केला तरच पृथ्वी वरील सर्व सजीवांचे अस्तित्व कायम राहील

मानवी विकासामध्ये एकतर्फी विचार न करता बहुआयामी धोरण स्विकारून परस्परांची गुणवत्ता सांभाळणे महत्वाचे असते. वर्तमान व भविष्यकालीन मानवी जीवन उंचावण्यासाठी श्वाश्वत विकासाची गरज आहे

निसर्गसंपत्तीचा योग्य वापर करून मानवी विकास केला तरच पृथ्वी वरील सर्व सजीवांचे अस्तित्व कायम राहील

पर्यावरणाचे नैसर्गीक संतुलन राखण्याकरिता मानवाच्या क्रिया-कर्मात अशा पध्दतीने बदल करणे गरजेचे आहे की ज्या व्दारे पर्यावरणाच्या घटकांचा कमीत कमी -हास होऊन मानवी विकास साधला जाईल

**संदर्भ :-**

एरक भरूचा-पर्यावरण शास्त्र
डॉ.प्रवीणकुमार नासरे-पर्यावरण शास्त्र
प्रा.आशिष माने-पर्यावरण अभ्यास एक आधुनिक दृष्टीकोन
त्रिवेणी फरकाडे-कौटुंबीक संसाधणांचे व्यवस्थापन